# लोकमंगल विज्ञान व उद्योजकता महाविद्यालयामध्ये शास्त्रज्ञ धवन यांचे व्याख्यान

पुणे येथील संशोधन क्षेत्रातील अग्रेसर मानल्या जाणाऱ्या मायलॅब कंपनीमध्ये शास्त्रज्ञ या पदावर कार्यरत असणाऱ्या व लोकमंगल विज्ञान व उद्योजकता महाविद्यालयाच्या माजी विद्यार्थिनी असणाऱ्या शास्त्रज्ञ श्रुती धवन यांचे "संसर्गजन्य आजाराचे तपासणी किट व त्याची विश्वासार्हता" या विषयावर दि. २५/०५/२०२३ रोजी व्याख्यान संपन्न झाले. ऑनलाईन पध्दतीने झालेल्या या व्याख्यानामध्ये धवन यांनी क्वॉलिटी कंट्रोल विभागातील कामाची पध्दती, तसेच त्याठिकाणी चालणारे वेगवेगळे प्रयोग यांची प्रात्यक्षिकासह विद्यार्थ्यांना माहिती करुन दिली. या व्याख्यानामध्ये नोकरीवर रुजु होताना येणाऱ्या समस्या व त्यावरील उपाय तसेच मुलाखतीमध्ये विचारले जाणारे संभाव्य प्रश्न याचीही यावेळी चर्चा करण्यात आली. त्याचबरोबर शिक्षण पुर्ण झाल्यानंतर नोकरीच्या मागे न लागता आपण स्वत: एखादी प्रयोग शाळा सुरु करुन आत्मनिर्भर होऊ शकतो असा आत्मविश्वासही त्यांनी विद्यार्थ्यांमध्ये निर्माण केला.

या व्याख्यानासाठी आपल्या महाविद्यालयाचे प्राचार्य डॉ. सतिशकुमार देवकर, जैवतंत्रज्ञान पदव्युत्तर विभागाचे प्रमुख डॉ. किरण जगताप, जैवतंत्रज्ञान विभागाचे प्रमुख प्रा. अंकुश गोरट्याल, डॉ. सुप्रतिक पालचौधरी, डॉ. अंकुर अधिकारी, प्रा. गौतम जाधव, प्रा. समाधान कदम, प्रा. विनय सामलेटी, प्रा. भारती जाधव, प्रा. शीतल भोजने, प्रा. किरण गायकवाड, प्रा. श्रेया खांडेकर, प्रा. अक्षरा कवडे, अर्चना गाडेकर आदि शिक्षक शिक्षकेत्तर कर्मचारी व विद्यार्थी मोठ्या संख्येने उपस्थित होते. या कार्यक्रमाचे सुत्रसंचालन व प्रास्ताविक प्रा. कविता संभारम यांनी केले तर आभार प्रदर्शन प्रा. अमृता नन्नवरे यांनी केले.







Lokmangal Science & Entrepreneurship College Wadala.

Principal
Lokmangal Science &
Entrepreneurship College,Wadala